पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ४**
सभावृत्तात

दिनांक :- ०५ / ०६ / २०१२ वेळ :- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक - ०५ / ०६ / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. यमुनाताई रमणनाना पवार
३) मा. प्रशांत शितोळे
४) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
५) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा. गावडे - सहा. आयुक्त, मा. चाकणकर - प्र. नगरसचिव, मा. काची - उपशहर अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -

विषय क्रमांक ३ :- पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील ४५.०० मीटर रूंद रस्त्यांबाबत - मा. नारायण बहिरवाडे, मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४ :- कासारवाडी येथील भाजी मंडई बाबत - मा. सिमा सावळे, मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ५ :- घरांसाठी सध्या अस्तित्वात असणा-या देय निर्देशंका व्यतिरिक्त जागेच्या क्षेत्रफळाच्या दुप्पट निर्देशांक देणेबाबत - मा. प्रशांत शितोळे, मा. नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ६ :- शहर सुधारणा समितीच्या अधिकाराबाबत - मा. प्रशांत शितोळे, मा. नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा. नारायण बहिरवाडे | अनुमोदक : मा. सिमा सावळे

मंगळवार दिनांक १९/०६/२०१२ रोजी सकाळी ११.४५ पर्यत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------------

**मा.सभापती** : बुधवार दिनांक १९/०६/२०१२ रोजी सकाळी ११.४५ पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ४**
सभावृत्तात
( दिनांक ०५/०६/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक :- १९ / ०६ / २०१२ वेळ :- सकाळी ११.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक ०५/०६/२०१२ ची तहकूब सभा मंगळवार दिनांक - १९ / ०६ / २०१२ रोजी सकाळी ११.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. यमुनाताई रमणनाना पवार
४) मा. उल्हास शेट्टी
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
७) मा. लोंढे गणेश नारायण
८) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
९) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा. गावडे - सहा. आयुक्त, मा. चाकणकर - प्र. नगरसचिव, मा. भदाणे - उपसंचालक नगररचना, मा. काची - उपशहर अभियंता, मा. ढगे, मा.तांबे, मा.पाटील - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १५/०५/२०१२ व १६/०५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक :- २५ विषय क्रमांक :- १

दिनांक :- १९/०६/२०१२

सुचक :- मा. प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा.उल्हास शेट्टी

संदर्भ :- मा. रामआधार धारिया मा. गोपाळ कुटे यांचा प्रस्ताव -

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील रेड लाईन व ब्लू लाईनमध्ये होत असलेल्या बांधकामांबाबत धोरण ठरविणे.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २६ विषय क्रमांक :- २

दिनांक :- १९/०६/२०१२

सुचक :- मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा. प्रशांत शितोळे

संदर्भ :- १) मा. माई ढोरे यांचा दिनांक ०२/१२/२०११ रोजीचा प्रस्ताव -

२) मा. ड प्रभाग समिती सभा दि. ०२/१२/२०११, ठ.क्र. ५०

विषय :- मौजे सांगवी येथील सर्व्हे नं. ९ व ८४ च्या पुर्व टोकाला गावठाणालगत असणारे चौकाचे आरक्षण दुरुस्त करणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार १८ डिसेंबर २०१२ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक :- २७ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- १९/०६/२०१२

सुचक :- मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा. प्रशांत शितोळे

संदर्भ :- मा. नारायण बहिरवाडे, मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील ४५.०० मीटर रुंद रस्ता चिंचवड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांच्या रेखांकनामधील सार्वजनिक / निम सार्वजनिक (Public Semipublic) या भूखंडावर प्रस्तावित आहे. परंतु या भूखंडावर साधारण सन १९५० पासून लिंगायत समाजाची दफन भूमी अस्तित्वात आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरात लिंगायत समाजाची लोकसंख्या बरीच असून पिंपरी चिंचवड शहरात या समाजाची ही एकमेव दफन भूमी आहे. तरी वरील बाबींचा विचार होऊन पिंपरी चिंचवड येथील लिंगायत समाजाच्या भावना न दुखावता शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या रेखांकनामधील चिंचवड स.नं. २२१ मधील सार्वजनिक व निमसार्वजनिक या

भूखंडावरील ४५.०० मी. रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र लगत उपलब्ध असलेल्या जागेतून मिळावे तो पर्यंत सदर भूखंडावर कोणतेही काम करण्यात येऊ नये यास मान्यता देणेत यावी अशी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २८ विषय क्रमांक :- ४

दिनांक :- १९/०६/२०१२

सुचक :- मा. सिमा सावळे अनुमोदक :- मा. यमुनाताई पवार

संदर्भ :- मा. सिमा सावळे, मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव -

कासारवाडी येथे भाजी मंडईचे आरक्षणामध्ये इमारत विकसित केलेली आहे. परंतु सद्यस्थितीत जागेवर सदर इमारतीमध्ये दवाखाना, करसंकलन कार्यालय, ग्रंथालय इ. वापर सुरु आहे. सदर भाजीमंडई आरक्षणातील विकसित केलेल्या इमारतीमध्ये भाजी विक्रेत्यांचा प्रतिसाद न मिळाल्याने सदर ठिकाणी मनपाने दवाखाना सुरु केलेला आहे. सदर परिसरात भाजी विक्रेते हे जवळच रेल्वे लाईनलगत असलेल्या वाहनतळाच्या जागेत बसून भाजी विकतात. त्यामुळे वाहनतळाच्या आरक्षणऐवजी सदर ठिकाणी भाजीमंडई विकसित केल्यास भाजीविक्रेत्यांच्या सोईचे होईल तसेच महापालिकेसही त्यापासून उत्पन्न मिळू शकेल. तरी त्याप्रमाणे आरक्षण वापरात बदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २९ विषय क्रमांक :- ५

दिनांक :- १९/०६/२०१२

सुचक :- मा. प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा. नारायण बहिरवाडे

संदर्भ :- मा. प्रशांत शितोळे, मा.नारायण बहिरवाडे पवार यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अनेक सर्वसामान्य नागरिकांनी स्वतंत्र घरे बांधली आहेत व उद्योगनगरीमध्ये या नागरिकांनी अर्धा गुंठा, एक गुंठा, दिड गुंठा, दोन गुंठे इतक्या जागेत घरे बांधली आहेत. मनपाने या जागांवर सध्या अस्तित्वात असणा-या देय निर्देशंका व्यतिरिक्त जागेच्या क्षेत्रफळाच्या दुप्पट निर्देशांक देणेत यावा व इतर नियमांमध्ये आवश्यक त्याप्रमाणे बदल करावा जेणेकरुन शहरातील अनाधिकृत बांधकामांना आळा बसेल, शहरातील मुलभूत सुविधा यामधे पाणीपुरवठा, विद्युत, ड्रेनेज, आरोग्य या सुविधांवर येणारा ताण कमी होईल. त्यामुळे सदर प्रस्तावाबाबत मनपाचा धोरणात्मक निर्णय घेवून शहरातील नागरिकांना दिलासा मिळावा म्हणून सदर प्रस्तावास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३०                                   विषय क्रमांक :- ६
दिनांक :- १९/०६/२०१२
सुचक :- मा. प्रशांत शितोळे                          अनुमोदक :- मा. नारायण बहिरवाडे
संदर्भ :- मा. प्रशांत शितोळे, मा.नारायण बहिरवाडे पवार यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समिती या समितीच्या अधिकारामध्ये खालीलप्रमाणे विविध विभागांच्या कामांबाबत या विभागांचा कार्यअहवाल या समितीस मंजूरीसाठी पाठविणेत यावा व या विभागांमध्ये मनपाच्या खालील विभागांचा समावेश असावा. वैद्यकीय विभाग, आरोग्य विभाग, भूमि-जिंदगी विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन विभाग, पाणी पुरवठा विभाग, मलनि:सारण विभाग, विदयुत विभाग, पर्यावरण विभाग या विभागांच्या कामांचा कार्यअहवाल समितीस पाठविणेत यावा. तसेच या मनपाच्या कोणत्याही स्वरुपाचा धोरणात्मक निर्णय हा शहर सुधारणा समितीच्या मंजूरीकरीता व शहर विकासाच्या अंमलबजावणी करीता मान्यतेकामी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / ९११ / २०१२
दिनांक :- २० / ०६ / २०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.